जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०२/०१/२०२४
## दि.०१/०१/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

| | |
|---|---|
| १ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ०२/२०२४,भादविक ३०७,३२३,५०४,१४३,१४४,१४७,१४८,१४९,महा. पो.का.क.३७(१)१३५, आर्म ॲक्ट ४(२५) |
| **फिर्यादी** | शुभम क्षीरसागर,वय-२२ वर्षे,रा.क्षीरसागर निवास,कात्रज-कोंढवा रोड,कात्रज,पुणे |
| **आरोपीत** | तीन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०१/०१/२०२४ रोजी रात्रौ ००/३० वा.स्वामी समर्थ नगर लेन नं.१ ,गोकुळनगर,कात्रज,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे वस्ती मध्ये राहणारा त्यांचा मित्र संकेत वाडकर,वय २२ वर्षे,रा.सदर यांनी फिर्यादी यांना फोन करुन सांगितले की,त्याला सदर भागात राहणारी त्याचे ओळखीचे तीन इसम व त्यांचे इतर साथीदार यांनी मला हाताने,दगडाने मारहाण करून,बाटलीने डोक्यात मारून जखमी केल्याने मला चक्कर येत आहे तु मला घ्यायला ये असे सांगितले असता,फिर्यादी हे संकेत यास नेण्यासाठी नमुद ठिकाणी गेले असता,सदर इसमांनी फिर्यादी यांना शिवीगाळ करून,हाताने व दगडाने मारहाण करून,त्यांचे जवळील धारदार शस्त्राने फिर्यादी यांच्या उजव्या बाजुचे कानाखाली,गळ्यावर व उजव्या गालावर वार करून,फिर्यादी यांना गंभीर जखमी करून,जीवे मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, विश्वास भाबड ८६६८४४९६८७ |
| २ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बंडगार्डन पो स्टे ०१/२०२४,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-५७ ,रा.स्पाईन रोड,भोसरी,पुणे |
| **आरोपीत** | मोपेड गाडीवरील १.संघर्ष महादेव बनसोडे,वय-२१,रा.एम.जी.रोड,कॅम्प,पुणे २.विशाल नाना सोनवणे,वय-२३,रा.भाजी मार्केट,१३ ताडीवाला रोड,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३१/१२/२०२३ रोजी २३/४० वा.तुकाराम शिंदे वाहनतळ,झुणका भाकर केद्रां जवळ,पुणे रेल्वे स्टेशन येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे नमुद ठिकाणी थांबले असताना,यातील नमुद इसमांनी आपसात संगनमत करून,मोपेड गाडीवरून फिर्यादी यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे हातातील ९,०००/- रु किचा मोबाईल फोन जबरी चोरी करून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. धनवडे ८९९९१३१८६८ |
| ३ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | पर्वती पो स्टे ०२/२०२४,भादविक ३०७,३२३,५०४,५०६,३४,क्रिमी.लॉ अमेंन्डमेंट ॲक्ट क.३ व ७ |
| **फिर्यादी** | किरण निमसे,वय-३१ वर्षे,रा.पानमळा वसाहत,सिंहगड रोड,पुणे |
| **आरोपीत** | तीन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०१/०१/२०२४ रोजी रात्रौ ०२/३० बुध्दविहार,पानमळा वसाहत, सिंहगड रोड पुणे येथे सार्वजनिक रोडवर |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे बुध्दविहार,पानमळा वसाहत,सिंहगड रोड,पुणे येथे सार्वजनिक रोडवर अभय कुडवे व त्याचेसोबत त्याचे मित्रां समवेत बोलत उभे होते. त्यावेळी फिर्यादी यांचे ओळखीचे यातील नमुद इसमांनी आपसात संगनमत करून, अभय कुडवे व त्याचे मित्रांसोबत भांडणे करून,फिर्यादी यांना धक्का-बुक्की व शिवीगाळ करुन,आमचे भांडणामध्ये येतो काय? थांब आत्ता तुला खलासच करुन टाकतो असे बोलुन,त्याचे हातातील कोयत्याने फिर्यादी यांचे डोक्यावर वार करीत असताना,त्यांनी तो कोयता हाताने पकडल्याचा राग येवून,त्यांनी फिर्यादी यांनी लाथा-बुक्क्यांनी मारून,त्यांना जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने त्यांचे डोक्यावर,पाठीवर, छातीवर,उजवे हाताचे मनगटावर कोयत्याने वार करून,गंभीर जखमी करून,जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. त्यावेळी फिर्यादी यांचे मित्र त्यांना वाचविण्यासाठी मध्ये आले असता,त्यांना कोयता दाखवुन कोणी मध्ये आला तर सोडणार नाही अशी धमकी दिली. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. चंद्रकांत कामठे ०२०/२४२२०२०५ |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणीकंद पो स्टे ०२/२०२४,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय ४० वर्षे,रा.मोरेवस्ती,चिखली,पुणे |
| **आरोपीत** | दोन इसम व त्याचा एक साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०१/०१/२०२४ रोजी १४/३० वा.मौजे पेरणे गावचे हद्दीत गोल्डन पॅलेसचे समोरील पीएमपीचे पार्किंग मधील बस मध्ये |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया .मौजे पेरणे गावचे हद्दीत गोल्डन पॅलेसचे समोरील पीएमपीचे पार्किंग मधील बस मध्ये प्रवासी म्हणुन चढत जात असताना,यातील नमुद दोन इसम व त्याचा एक साथीदार यांनी आपसात संगनमत करून,बस मधील गर्दिचा फायदा घेवुन,फिर्यादी यांची १. पत्नी तसेच बस मधील इतर प्रवाशी २.साहेबराव तायडे, २.एक महिला ३.ज्ञानेश्वर घडसिंग, ४.विजय जांभुळकर, ५.रमेश सुतार यांचेही गळयातील सोन्याचे दागिने अंदाजे २,६०,०००/- रु किचे जबरी चोरी करून नेले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, गोडसे ८०८२०७७१०० |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडकी पो स्टे ०१/२०२४,भादविक ३०७,३४ |
| **फिर्यादी** | शाहरुख शेख,वय-२१ वर्षे,रा.सर्व्हे नं.२४,बोपोडी,पुणे |
| **आरोपीत** | तीन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ३१/१२/२०२३ रोजी २१.३० वाजेच्या सुमारास सार्वजनिक शैचालाचे जवळ, पी.एम.टी. बस स्टॅन्ड जवळ, खडकी पुणे येथे. |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी आपसात संगनमत करून,फिर्यादी यांचा मित्र प्रतीक सपकाळ,वय-२३ वर्षे,रा.१७३,गोपी चाळ,खडकी बाजार,पुणे याचेबरोबर आठ दिवसापुर्वी झालेल्या वादाचे कारणा वरून,नमुद ठिकाणी सदर इसमांनी प्रतीक सपकाळ यास जीवे ठार मारण्याचे उद्देशाने,पकडो इसको आज खत्म करते है असे म्हणुन फिर्यादी यांचे तोंडावर लांब धारदार पालघने वार करून,त्यांना गंभीर जखमी करून,जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. अनिल रिकीबे ९०२८०६५४५४ |
| **६** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणीकंद पो स्टे ०३/२०२४,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-६४ वर्षे,रा.पश्चिम बदलापुर,जि.ठाणे |
| **आरोपीत** | दोन इसम व त्याचे इतर साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०१/०१/२०२४ रोजी दुपारी १४/४५ वा.पुणे-नगर रोड पेरणे टोल नाका,सिद्धेश्वर मंगल कार्यालय,पेरणे,ता.हवेली,जि.पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे पी.एम.पी.एल बस मध्ये चढत असताना,यातील नमुद दोन इसम व त्याचे इतर साथीदार यांनी आपसात संगनमत करून,बस मधील गर्दीचा फायदा घेऊन,फिर्यादी व बस मधील इतर प्रवासी २.सुरेश गायकवाड ३.सुमेध सार्वेत ४.अजय भालेराव ५.संकेत वडवराव व दोन महिला यांचे गळयातील सोन्याचे दागिने अंदाजे २,६९,०००/- रु चे जबरी चोरी करून नेले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, गजानन जाधव ९८२२७४२३३३ |

७

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ०१/२०२४,भादविक ३२४,३३७,४२७,१४३,१४४,१४७,१४९,५०४,५०६,महा.पो.का.क.३७(१)१३५,आर्म ॲक्ट ४(२५),क्रिमीनल लॉ अमेंन्डमेंट ॲक्ट क.३ व ७ |
| **फिर्यादी** | किशोर वायदंडे,वय ४३ वर्षे,रा.कृष्णानगर,महंमदवाडी,हडपसर,पुणे |
| **आरोपीत** | चार इसम व इतर दोन अनोळखी महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३१/१२/२०२३ रोजी रात्रौ ११/०० वा.वॉशिंग सेंटरच्या जवळ,गल्ली नं.०५,कृष्णानगर, महंमदवाडी,पुणे व दि.०१/०१/२०२४ रोजी ०२/३० वा.चे दरम्यान फिर्यादी यांचे राहते घरी गल्ली नंबर ०५,कृष्णानगर,महंमदवाडी,हडपसर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे दि.३१/१२/२०२३ रोजी रात्रौ ११/०० वा.शतपावली करीत असताना,यातील नमुद इसमांनी फिर्यादी यांना तु इथ का थांबला आहेस,तु ईथला भाई आहेस का असे म्हणुन फिर्यादी व त्यांचे पत्नीस शिवीगाळ करून,मी इथला भाई आहे,तुला पाहून घेतो अशी धमकी देवुन,फिर्यादी व त्यांचे मेव्हणीचा मुलगा हर्ष भिसे यास धारधार हत्याराचा धाक दाखवुन,त्याच्या मुलाचे हातातील बॅटने मारून जखमी केले. तसेच दि.०१/०१/२०२४ रोजी ०२/३० वा.सदर इसम व दोन अनोळखी महिला यांनी फिर्यादी यांचे घरावर दगडी,विटा तसेच बॅट व लाकडी दांडक्याने मारून घराचे पत्रे,दरवाजावरील जाळी,लाईट मिटर तोडुन नुकसान केले आहे. तसेच फिर्यादी यांचे घरावर मारलेल्या दगडांमुळे फिर्यादी यांचा मुलगा आदित्य वायदंडे याचे उजव्या पायाला लागुन जखम झालेली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. बालाजी डिगोळे ८१०८४३१११५ |

८

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे ०१/२०२४,भादविक २७९,३०४(अ),मोव्हेॲक्ट १८४,१३४(अ)(ब), ११९/१७७ |
| **फिर्यादी** | शिवाजी तोंडे,वय ५५ वर्षे,रा.मु.पो.भावडी,ता.हवेली,जि.पुणे |
| **आरोपीत** | पाण्याच्या टँकरवरील अज्ञात चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३१/१२/२०२३ रोजी सकाळी ०९/५० वा.हिरो शो-रुम समोर,संतनगर,लोहगाव-वाघोली रोडवर,लोहगाव,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा मुलगा मनोहर शिवाजी तोंडे,वय-२२ वर्षे,रा.मु.पो.भावडी,ता.हवेली,जि.पुणे हा त्याचे मोटार सायकलवरुन लोहगावकडुन वाघोलीकडे जात असताना,यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील पाण्याच्या टँकर हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने, अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी मोटार सायकलस्वार मनोहर तोंडे यांस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, सचिन धामणे ९५०३२४६५५५ |

९

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | फरासखाना पो स्टे ०३/२०२४,भादविक ३८१ |
| **फिर्यादी** | दिपक माने,वय-३९ वर्षे,रा.५१/५२,साई कॉर्नर,रास्ता पेठ,पुणे |
| **आरोपीत** | फिर्यादी यांचे दुकानामध्ये सध्या काम करणारे किंवा पुर्वी काम करणारे कामगार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३१/१२/२०२३ रोजी रात्रौ २०/०० वा.ते दि.०१/०१/२०२४ रोजीचे सकाळी १०/०० वा.चे दरम्यान ७९७,रविवार पेठ,पुणे येथील राज कास्टींग या दुकाना मध्ये |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे ७९७,रविवार पेठ,पुणे येथील राज कास्टींग नावाचे दुकान कुलुप लावुन बंद असतांना,त्याचे दुकाना मध्ये सध्या कामासाठी असलेले किंवा यापुर्वी काम करत असलेल्या कामगारां पैकी कोणीतरी कामगाराने फिर्यादी यांचे दुकानाची व तिजोरीची बनावट चावी बनवून,त्याचावीने दुकानाचा दरवाजा उघडुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,दुकाना मधील लोखंडी तिजोरी बनावट चावीने उघडुन,त्यामध्ये ठेवलेले १०,९३,२६०/- रुपये रोख रक्कम व सोन्याचे दागिने असा एकुण ३,३२,०९,२२८/- रू किचा ऐवज चोरी करून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा पोलीस निरीक्षक, वैभव गायकवाड ९९२१०९००४४ |

१०

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ०१/२०२४,भादविक ३०४(अ),२७९,मोटर वाहन का.कलम ११९/१७७, १३४(अ)(ब) प्रमाणे |
| **फिर्यादी** | निलेश खडतरे,वय-३८ वर्षे,रा.सनं.११७,भेकराईनगर,फुरसुंगी,हडपसर,पुणे |

| | |
|---|---|
| **आरोपीत** | चारचाकी ट्रक वरील चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०१/०१/२०२४ रोजी रात्रौ २०/३० वा.कचरा डेपोचे समोर सासवड कात्रज रोड,फुरसुंगी हडपसर,पुणे येथील सार्वजनिक रोडवर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे दुकानात कामगार म्हणुन असलेला किसन बद्री विश्वकर्मा,वय-२३ वर्षे, रा.हडपसर,पुणे हा दुचाकीवरून त्याचे राहते घरी जात असताना,यातील नमुद चारचाकी ट्रक वरील चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने, अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी मोटार सायकलस्वार किसन विश्वकर्मा यांस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन, अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरिक्षक, नानासाहेब जाधव ९८७०३८०२३७ |
| **११** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणी-काळभोर पो स्टे ०१/२०२४,भादविक २७९,३०४(अ),३३८,३३७,मोव्हेॲक्ट १८४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | संतोष अंदुरे,पोलीस अंमलदार, लोणी-काळभोर पोलीस स्टेशन,पुणे शहर |
| **आरोपीत** | विशाल सुदाम कोंडे,वय-३० वर्षे,रा.मुं.मेमाणवाडी,मिरवडी,पो.दहिटणे,ता.दौंड,जि.पुणे (मयत) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ३१/१२/२०२३ रोजी १९/४० वा.शिंदवणे,वाकवस्ती कॉर्नर,ता.हवेली,जि.पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील मोटर सायकल ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी त्याचे मोटर सायकल वरील नियंत्रण सुटल्याने,उरुळी-कांचनकडुन येणारा मोटर सायकल चालक वैभव उत्तम खेडेकर,वय-३० वर्षे व त्याचे पाठीमागे बसलेली त्याची आई सौ.रेखा उत्तम खेडेकर, वय-६० वर्षे दोघे रा.शिंदवणे गाव,ता.हवेली,जि.पुणे या दोघांना स्वतःहुन समोरुन धडक देवुन, दुचाकीस्वार वैभव खेडेकर व त्याची आई सौ.रेखा खेडेकर हिस गंभीर जखमी करून, विशाल कोंडे हा गंभीर जखमी होवुन,स्वतःचे मृत्युस कारणीभुत झाला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, खोसे ९८८१३१३३५३ |
| **१२** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | फरासखाना पो स्टे ०२/२०२४,भादविक ३०६,४९८(अ),३२३,५०४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-४७ वर्ष,रा.मोहननगर,चिंचवड,पुणे |
| **आरोपीत** | मयताचा पती (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ३१/१२/२०२३ रोजी रात्रौ २२/३० वा. २३२,मंगळवार पेठ,पुणे राहते घरी |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची मुलगी सौ.दिक्षा तेजस कांबळे,वय-२७ वर्ष,रा.२३२ मंगळवार पेठ,पुणे हिस तीचे पती यातील नमुद इसम याने सन २०२० मध्ये तीचेबरोबर लग्न झाल्यापासुन,त्याचे आई-वडील यांचा नीट सांभाळ करत नाही म्हणुन तसेच तीचे चारीत्र्यावर संशय घेवून तीचा शारिरीक व मानसीक त्रास देवुन,वेळोवेळी शिवीगाळी व मारहाण केल्याने,त्याचे सततचे त्रासाला कंटाळुन,सौ.दिक्षा कांबळे हिने तीचे राहते घरात दरवाजा बंद करून,गळफास घेवून आत्महत्या करण्यात प्रवृत्त केले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलिस निरीक्षक, संतोष शिंदे ९९२३४३३८२० |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**